# वार्ता टिपण दि.२०/०६/२०१९

## माथाडी संघटनेचे नावाखाली खंडणी मागणा-या टोळीचा,खंडणी विरोधी पथक,पश्चिम यांचेकडुन पर्दाफाश करून आरोपींना अटक

कोरेगावपार्क पोस्टे पुणे येथे गु.र.नं.२०२/२०१९ भादंविक ३८४,३८५,३८६, ३८७, ५०६(२), ३४ या गुन्हयातील फिर्यादी नामे हिरालाल श्रीनाथ यादव उम्र ४४ साल धंदा- नौकरी शिक्षण- १२ वी, पता-सरस्वती सोसायटी, फलॅट नं.१९, ताडीवाला रोड पुणे हे अमित कन्स्लंटट, मुंबई येथील कंपनीत सुपरवायझर म्हणुन नोकरी करतात. त्यांचे कंपनीला जानेवारी २०१९ मध्ये पुणे येथील रूबी हॉल क्लिनीकचे आवारातील सुपरी स्पेशालिटी कॅन्सर सेंटर या बांधकाम चालु असलेले इमारतीचे प्लंबिग व फायर फाईटिंगचे काम मिळाले आहे.सदर कामे करणेसाठी फिर्यादी हे पुण्यात आले आहेत. सदर ठिकाणचे कामे चालु असताना तथाकथीत माथाडी कामगार संघटनेचे नावाखाली ताडीवालारोड झोपडपटटी भागातील गुंड नामे बाबु वसंत ननावरे, गोविंद गायकवाड, व इतर २ ते ३ इसमांनी येवुन वेळोवेळी फिर्यादी यांना कोणतेही माथाडीचे काम न करता, सदर इमारतीचे चौथ्या मजल्यावरून फिर्यादी व इतर साक्षीदार यांना जिवे ठार मारण्याचे उददेशाने फेकण्याची धमकी देवुन, व काम चालु ठेवायचे असेल तर माथाडीचे पैसे दयावे लागतील असे म्हणुन वेळोवेळी मिळुन फिर्यादी यांचे कंपनीचे मालकाकडुन धनादेशाद्वारे व रोखीने असे एकुण ८०,०००/- रूपये खंडणी स्वरूपात घेतले आहेत.त्याबाबत वरीलप्रमाणे गुन्हा दाखल झालेला आहे.

सदर गुन्हयामध्ये आरोपी नामे (१) बाबु वसंत ननावरे वय-३० वर्ष रा.सर्व्हे नं.१३ ताडीवाला रोड, लोकसेवा वसाहत, साई मंदिराजवळ, पुणे, (२) गौतम आप्पा जगदाळे वय-२४ वर्ष रा.सर्व्हे नं.१३ ताडीवाला रोड, दुष्काळ झोपडपटटी लेन नं.२७ पुणे यांना पकडुन दि.१९/०६/१९ रोजी २२/३० वा.अटक केली आहे. त्यांची मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.न्यायालय क्रमांक ३ पुणे यांनी दि. २३/०६/२०१९ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

पुणे पालीसांचे वतीने सर्व व्यावसाईकदारांना आवाहन करण्यात येते की, वरील आरोपी यांनी माथाडी कामगार संघटनेचे नावाखाली खंडणी मागितली असल्यास,त्याचे कारवाईसाठी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,पश्चिमचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते यांचेशी संपर्क साधावा.

**वरील कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त, मा.श्री.अशोक मोराळे सो., पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे सो, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री. समिर शेख सो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते,पोलीस उपनिरीक्षक निखील पवार व आनंद रावडे तसेच पोलीस कर्मचारी अविनाश मराठे, भाऊसो.कोंढरे, रमेश गरूड, प्रमोद मगर, हनुमंत गायकवाड, प्रकाश मगर, संतोष मते, मनोज शिंदे, पांडुरंग वांजळे, विजय गुरव, फिरोज बागवान, शिवानंद बोले, सचिन कोकरे, अमोल पिलाने, मंगेश पवार, प्रविण पडवळ, नारायण बनकर,उदय काळभोर,महेश कदम यांनी केली आहे.**